# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शनिवार, दिनांक २५ मार्च, २०१७ / चैत्र ४, १९३९ ( शके )**

**(१) शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री**
**(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**
**(३) पर्यावरण मंत्री**
**(४) पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री**

} **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५१**

---

**माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र परिक्षेत वाढीव गुणांची सवलत देण्याबाबत**

**(१) * २८२९८ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने क्रिडा क्षेत्राबरोबरच शास्त्रीय कला, चित्रकला आणि लोककलेत प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांना माध्यमिक शाळांत परिक्षेत १५ ते २५ वाढीव गुण देण्याचा आदेश काढल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८ पासून होणा-या माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र परिक्षेत वाढीव गुणांची सवलत देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी माध्यमिक शाळांना सूचना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मार्च, २०१७ पासून होणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षेपासून सदर वाढीव गुणांची सवलत देण्यात येणार असून यानुषंगाने कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कसई (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) गावाचा मुख्यमंत्री पेयजल योजनेत समावेश करण्याबाबत**

**(२) * २९०८४ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कसई (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) गावाचा मुख्यमंत्री पेयजल योजनेत समावेश करुन गावाच्या पाणीपुरवठा योजनेस विशेष मंजूरी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्र्यांकडे दिनांक २१ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त गाव टँकरमुक्त करुन गावाचा पाणी टंचाईचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी मुख्यमंत्री पेयजल योजनेंतर्गत विशेष मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.
(२) मौ.कसई गावाकरिता सन १९९७-९८ मध्ये राबविण्यात आलेल्या योजनेतून सद्य:स्थितीत पाणीपुरवठा सुरु आहे. सन २००६-०७ मध्ये भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या योजनेची उध्दरण वाहिनी नादुरुस्त असल्याने या योजनेतून पाणीपुरवठा बंद आहे. परंतु १४ व्या वित्त आयोगातून प्राप्त निधीतून उध्दरण नलिका दुरुस्तीचे काम हाती घेऊन पाणीपुरवठा सुरु होऊ शकतो. तसेच जिल्हयात सरासरीच्या १०८ टक्के पर्जन्यमान झाल्यामुळे बहुतांशी साठवण तलावामध्ये पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यातून कसई गावास अस्तित्वातील दोन्ही योजनांद्वारे पाणीपुरवठा होऊ शकतो.

तसेच टंचाई कालावधीत आवश्यकता भासल्यास उद्भव विहिरीजवळ टंचाई उपाययोजना घेऊन उद्भव विहिरीत पाणी सोडून गावास पाणीपुरवठा होऊ शकतो. त्यामुळे नवीन योजना घेण्याची आवश्यकता नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ईस्लापूर (ता.किनवट, जि.नांदेड) परिसरातील धान्याचा काळाबाजार रोखण्याबाबत**

**(३) * ३०४०८ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ईस्लापूर (ता.किनवट, जि.नांदेड) परिसरातील स्वस्त धान्य दुकानातील गोरगरिब जनतेसाठी मिळणारे धान्य अवैधरित्या साठवून स्थानिक अधिकाऱ्यांच्या संगनमताने काळया बाजारात विक्री होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन धान्याचा काळाबाजार रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसई (जि.पालघर) येथील नळपाणी योजनेच्या प्रलंबित कामांबाबत**

**(४) * २७०१५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर : तारांकित प्रश्न क्रमांक २५३२८ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) येथील वाघोली, नवाळे, मर्देस, निर्मळ, रानगांव, अर्नाळा, नाळे, राजोडी, कामण, देवदळ, बापाणे, ससूनघर आदी ६९ गावांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणीपुरवठा योजनेचे काम सन २०१० मध्ये वा त्यादरम्यान पूर्ण होणे अपेक्षित होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामास तीन वेळा मुदतवाढ देण्यात आली असून नळपाणी योजनेच्या कामासाठी १०० कोटीहून अधिक खर्च होऊनही अपूर्ण स्थितीत असलेल्या ६९ गावांच्या पाणीपुरवठा योजनेचे लेखापरीक्षण करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वसई-विरारसह उपप्रदेशात पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत असल्याकारणाने सदर नळपाणी योजनेची प्रलंबित असलेली कामे पूर्ण होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) या योजनेच्या एकूण चार निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यापैकी तीन निविदांना तीन वेळा व एका निविदेला दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे. वाढीव मुदतीत या योजनेवर अद्ययावत रुपये ९०.११ कोटी इतका खर्च झाला असून ९८ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. मा.मुंबई उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्रमांक ८१/२०१३ मध्ये दिलेल्या आदेशानुसार योजनेच्या कामाची तपासणी करण्यासाठी सहायक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी त्यांचा अहवाल दिनांक १९/०८/२०१४ रोजी मा. उच्च न्यायालयास सादर केला आहे.

(३) सद्य:स्थितीत ६९ गावांपैकी ५२ गावे ही वसई-विरार महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट झाली आहेत. या गावांना वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अस्तित्वातील योजनेतून विविध ठिकाणी नळ जोडणीद्वारे पाणीपुरवठा करणे प्रस्तावित आहे. सध्या वसई-विरार महानगरपालिका हद्दीत तीव्र पाणीटंचाई असल्यामुळे १० गावांना महानगरपालिकेमार्फत पाणीपुरवठा सुरु आहे. वसई विरार महानगरपालिकेस ९२ द.ल.लि. पाण्याचा तुटवडा असल्याने मनपाची प्रगतीपथावर असलेली नगरोत्थान अभियानांतर्गत वाढीव १०० द.ल.लि. पाणीपुरवठा योजना (सुर्या उद्भव टप्पा-३) पूर्ण झाल्यावर महानगरपालिकेमार्फत उर्वरित गावांना पाणी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात मॅकडोनल्डस व अन्य फूड जॉइंटस, मॉल, मल्टिप्लेक्समध्ये शीतपेय, कॉफी विकून ग्राहकांची फसवणूक होत असल्याबाबत**

**(५) * २७२१३ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मॅकडोनल्डस व अन्य फूड जॉइंटस, मॉल, मल्टिप्लेक्समध्ये शीतपेय, कॉफी कागदी कपातून ग्राहकांना विकली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मॅकडोनल्डस व अन्य फूड जॉइंटस, मॉल, मल्टिप्लेक्समध्ये शीतपेय, कॉफी ग्राहकांना देताना त्यात कॅफेन असल्याची माहिती ग्राहकांना देणे बंधनकारक असल्याचे आदेश अन्न व औषध प्रशासनाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अन्न व औषध प्रशासनाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) ज्या शीतपेय वा अन्नपदार्थांमध्ये कॅफेन टाकले जाते व ते ग्राहकांना ज्या पात्रामधून विक्री केले जाते त्यावर "कंटेन्स कॅफेन" असे नमूद करणे बंधनकारक आहे असे आदेश आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी दिनांक ०६/०१/२०१७ रोजी अपील प्रकरणात दिले आहेत.

आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी दिनांक ०६/०१/२०१७ रोजी दिलेल्या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश राज्यातील सर्व सहआयुक्त (अन्न) यांना देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अंधेरी (मुंबई) येथील कोंडिवटे लेण्याची दुरुस्ती करुन अनधिकृत बांधकामे हटविणेबाबत**

**(६) * ३०१५० श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) येथील कोंडिवटे लेण्याची दुरवस्था झाली असून अनधिकृत बांधकामे करण्यात आली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार लेण्याची दुरुस्ती करणेबाबत तसेच अनधिकृत बांधकामे हटविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) अंधेरी (मुंबई) येथील कोंडिवटे लेणी केंद्र संरक्षित लेणी असून ती केंद्र शासनाच्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ, मुंबई या कार्यालयाच्या अधिपत्याखाली असून याबाबत भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळाकडून पुढील कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई विद्यापीठाच्या माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा (आयटी लॅब) सुरु करण्याबाबत**

**(७) * ३०५६२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या आयडॉलच्या बी.एस.सी.आय.टी, बी.एस.सी.कॉम्पुटर सायन्स, एम.एस.सी.आय.टी. आणि एम.एस.सी. कॉम्पुटर सायन्स सह एमसीएच्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने ७५ कॉम्पुटरसह माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा (आयटी लॅब) सुरू केल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाचे हायटेक होण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न सुरू असताना दुसरीकडे विद्यापीठाच्या आयडॉलमधील माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा (आयटी लॅब) मागील दिड वर्षापासून बंद आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा (आयटी लॅब) बंद असल्यामुळे बी.एस.सी.आय.टी, बी.एस.सी.कॉम्पुटर सायन्स, एम.एस.सी.आय.टी. आणि एम.एस.सी. कॉम्पुटर सायन्स सह एमसीएच्या प्रथम वर्ष अभ्यासक्रमातील तब्बल ३ हजार विद्यार्थी प्रॅक्टिकलपासून वंचित राहिले असून अंतिम निकालावर त्याचा परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई विद्यापीठाच्या माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा (आयटी लॅब) सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

मुंबई विद्यापीठाच्या आयडॉलमधील माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा (आयटी लॅब) मागील दिड वर्षापासून बंद नसून फ्लोअरिंग दुरुस्तीकरिता एक ते दीड महिने लॅब बंद ठेवण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

बी.एस.सी.आय.टी., बी.एस.सी.कॉम्पुटर सायन्स, एम.एस.सी.आय.टी. आणि एमसीए अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे व्याख्यान, टर्म वर्क, मौखिक प्रॅक्टिकल्स PCP सेंटरमध्ये घेण्यात येतात तसेच एम.एस.सी.कॉम्पुटर सायन्स या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी याच कॅम्पसमध्ये व किर्ती महाविद्यालयात सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(४) संपूर्ण लॅब आधुनिक पध्दतीने तयार करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोट (जि.अकोला) तहसिल कार्यालयातील शिधापत्रिकाधारकांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(८) * २९२३७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोट (जि.अकोला) तालुक्यातील तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागामध्ये शिधापत्रिकाधारकांचे ७०० ते ८०० नविन शिधापत्रिका तसेच दुय्यम शिधापत्रिका, नावे वगळणे आदी प्रकरणे मागील दोन वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिधापत्रिकाधारकांची कामे प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

अकोट (जि.अकोला) तालुक्यातील तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागामध्ये गत दोन वर्षापासून नवीन शिधापत्रिका तसेच दुय्यम शिधापत्रिका, नावे वगळणेबाबत एकही शिधापत्रिका प्रलंबित नाही. तथापि, नवीन शिधापत्रिका मिळण्यासाठी प्राप्त अर्जापैकी ४३१ अर्जामध्ये त्रुटी आढळून आल्या असून अर्जदारांनी केलेल्या त्रुटीच्या पूर्ततेनंतर संबंधित अर्जदारांना शिधापत्रिका देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील ग्रामिण भाग हगणदारी मुक्त करण्याबाबत**

**(९) * २८६०७ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.आनंदराव पाटील : दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक २१६२१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रामिण) राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत राज्यातील १० हजार ७७० ग्रामपंचायती हागदारीमुक्त घोषित झाल्या असून ग्रामिण भाग हगणदारी मुक्त करण्यासाठी उघडयावर शौचास बसण्याच्या सवयींना प्रतिबंध लावण्यासाठी ग्रामपंचायत कायदयात सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यक्रमांतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात राज्यात १८ लाख शौचालये बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उघडयावर शौचास बसणाऱ्यांवर कारवाई व उपाययोजना करुन शौचालये बांधण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्यादृष्टीने कृती कार्यक्रम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत राज्यात आजमितीस १४,१३७ ग्राम पंचायती हागणदारी मुक्त झाल्या आहेत. ग्रामीण भाग हागणदारी मुक्त करण्यासाठी उघड्यावर शौचास बसण्याच्या सवयींना प्रतिबंध लावण्यासाठी ग्रामपंचायत कायद्यात सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली नाही.

(२) सन २०१६-१७ या वर्षात राज्यात १८, ०४, २९९ वैयक्तिक शौचालय बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते.

(३) स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत जिल्हास्तरीय यंत्रणेमार्फत उघड्यावर शौचविधीस जाण्यापासून ग्रामस्थांना प्रतिबंध करण्यासाठी व शौचालय बांधण्यासाठी व त्याच्या वापरासाठी ग्रामस्थांची मानसिकता तयार करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. यामध्ये खालील उपायांचा समावेश आहे.

१. गुड मॉर्निंग पथक
२. गृह भेटी
३. पोलीस अधिनियम ११५ व ११७ नुसार कारवाई
४. महिला बचत गट, शालेय विद्यार्थी यांच्यामार्फत शौचालय बांधण्यासाठी व वापरासाठी उपक्रमांचे आयोजन
५. गवंडी प्रशिक्षण

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात महाविद्‌यालयातील अध्यापकांना वेतन देण्याबाबत

**(१०) * २७४३४ श्री.नारायण राणे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शैक्षणिक संस्था चालविताना काही अडचणी येत असल्या तरीही कर्मचारी व अध्यापकांना वेळेवर वेतन दिले पाहिजे अशी सुस्पष्ट भूमिका मा.उच्च न्यायालयाने यापूर्वीच घेतली असून मा.सर्वोच्च न्यायालयाने ६ वा वेतन आयोग त्वरीत देण्याबाबत शासनाला माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान आदेश दिले असूनही राज्यात ३४६ अभियांत्रिकी महाविद्‌यालये व ४७१ पदविका तंत्रनिकेतने असून गेल्या ९ ते १० महिन्यांपासून बहुतांशी महाविद्‌यालयामधील अध्यापकांना वेतन मिळाले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडा व विदर्भातील अनेक महाविद्‌यालयांत ५० टक्के विद्‌यार्थ्यांच्या जागा भरलेल्या नसून समाजकल्याण विभाग, आदिवासी विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून मागासवर्गीय, आर्थिकदृष्टया मागास विद्‌यार्थी व आदिवासी विद्‌यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपुर्तीचे कोट्यवधी रुपये शासनाकडून संबंधित संस्थांना देण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सीटीझन फोरम या अभियांत्रिकी अध्यापकांच्या संघटनेने अध्यापकांना वेळेवर पगार मिळावा यासाठी मा.मुख्यमंत्री, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद आणि शिक्षण शुल्क समितीकडे सातत्याने निवेदने सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे, तथापि प्रश्नाधीन प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार विनाअनुदानित पदवी/पदविका संस्थांना वेतन आयोगानुसार वेतन देण्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थांच्या व्यवस्थापनाची असल्याने व संलग्नित महाविद्‌यालयातील शिक्षकांच्या वेतनाच्या बाबी व्यवस्थापनाच्या अखत्यारीत येतात.

(२) तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना करावयाच्या शुल्क प्रतिपूर्तीची सन २०१५-१६ या वर्षापर्यंतची थकबाकी सर्व संस्थांना अदा करण्यात आलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या ई-स्कॉलरशीप योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी केंद्र शासनाकडे बाकी असलेल्या निधीसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील विद्यापीठाची जिल्हानिहाय उपकेंद्रे स्थापन करण्याबाबत**

**(११) * २७६८७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक विद्यापीठांचे कार्यक्षेत्र चार ते पाच जिल्ह्यांचे मिळून निश्चित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाचे मुख्य केंद्र असलेला जिल्हा वगळून त्या क्षेत्रातील इतर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना कामासाठी अनेक वेळा लांब अंतरावरील विद्यापीठात जावे लागत असल्यामुळे या विद्यापीठांची जिल्हानिहाय उपकेंद्रे स्थापन करण्यात यावीत, अशी विद्यार्थी व पालकांकडून मागणी होत असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून एका राजकीय पक्षाच्या विद्यार्थी प्रदेश अध्यक्षांनी आतापर्यंत सात मोर्चे काढून आता विधान भवनावर मोर्चा काढण्याचा इशारा शासनास माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत नगर व नाशिक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत सांगली व सातारा, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांतर्गत बुलढाणा व वाशिम तसेच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत धुळे या जिल्ह्यांमध्ये उपकेंद्रे स्थापन करावीत, अशी मागणी करुन त्यासाठी राज्यात जिल्हावार मोर्चे काढून त्याबाबतची निवेदने संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु, प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री व मा.मुख्यमंत्री यांना माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सादर केलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार राज्यात विविध ठिकाणी विद्यापीठाच्या उपकेंद्राची स्थापना करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३) अंशतः खरे आहे.

(४) राज्यातील अकृषि विद्यापीठांतर्गत होणाऱ्या उपकेंद्रासाठी धोरण विहित करण्यासाठी माजी प्र.कुलगुरु डॉ.योगानंद काळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवालातील शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ दिनांक ०१/०३/२०१७ पासून लागू झाला असून त्यातील कलम ३८ व ३९ मध्ये उपपरिसर (उपकेंद्र) बाबत तरतुद विहित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रयोगशाळा परिचरांना न्याय देण्याबाबत

**(१२) * २६७९२ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षण विभागाने सन २०१३ ची संचमान्यता करताना १५ हजार प्रयोगशाळा परिचरांना अतिरिक्त दाखविण्यात आले असल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६-१७ च्या संचमान्यतेत परिचरांची पदे रद्द करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रयोगशाळा परिचऱ्यांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक २३/१०/२०१३ नुसार विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची पदे दर्शविण्यात आलेली आहेत.

(२), (३) व (४) हे खरे नाही. तथापि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सुधारित आकृतिबंधाबाबत आयुक्त (शिक्षण) यांच्या समितीने शिफारस केलेल्या मुद्द्यांवर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## पुणे आणि परिसरातील प्रदुषण रोखण्याबाबत

**(१३) * २९५५६ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे आणि परिसरात निरभ्र आकाश हरविल्याने जल, ध्वनी आणि वायू या प्रदुषणामध्ये वेगाने वाढ होत असल्याचे खगोल अभ्यासकांच्या माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार प्रदुषणात वाढ होवू नये याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) खगोल अभ्यासकांचा अहवाल प्राप्त नाही. तथापि, पुणे व पिंपरी चिंचवड शहरांतर्गत पाच ठिकाणी हवेचे प्रतिदिन नमुने तपासले जातात. प्राप्त पृथःकरण अहवालानूसार राष्ट्रीय हवा गुणवत्ता मानकांशी तुलना करता सदर नमुने सरासरी मानकांच्या मर्यादेत आढळल्याने पुणे आणि परिसरातील निरभ्र आकाश हरविले आहे हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-------------------

## राजर्शी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेतील प्रथम श्रेणीची अट शिथिल करणेबाबत

**(१४) * २९८५५ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना विशेषतः आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्याकरिता शासनाने राजर्शी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती प्रती योजना जाहीर करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुपये २.५० लाख उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांना विनाअट व रुपये २.५० ते ६.०० लाख पर्यंत उत्पन्न असलेल्या त्याच वर्गातील प्रवेशासाठी प्रथम श्रेणीची अट ठेवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एकाच वर्गात शिक्षण घेणाऱ्या दोन वेगळया उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांना वेगवेगळे निकष लावल्यामुळे याबाबत सुसूत्रता येण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना शिक्षणाची अधिक संधी उपलब्ध होण्यासाठी पूर्वीच्या रुपये १.०० लक्ष च्या उत्पन्न मर्यादेत वाढ करुन ती सरसकट रुपये २.५० लक्ष केली आहे. तसेच रुपये ६.०० लक्ष च्या उत्पन्न मर्यादेतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना देखील सदर योजनेचा लाभ मिळावा यास्तव गुणांची अट निर्धारीत केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत**

**(१५) * २७३८१ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे : तारांकित प्रश्न क्रमांक २३८४९ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००५ पासून खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी भरतीला बंदी घातली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्त, राजीनामा, अकाली मृत्यू यामुळे खाजगी शाळेतील अनेक शिक्षकेतर कर्मचा-यांची पदे रिक्त झाली असून शिक्षकेतर कर्मचारी आकृतिबंध तयार करणेबाबत समिती गठीत करण्यात आली, सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शिक्षेकतर पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अंशत:/पुर्णत: अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी सुधारीत आकृतिबंध तयार करण्यासाठी गठीत समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असून त्यानुषंगाने शासनस्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**आडगांव (जि.नाशिक) येथील नाशिक विभागीय शिक्षण मंडळाच्या संपादित जागेवरील बांधकामाबाबत**

**(१६) * २६९६४ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २३८०९ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडगांव (जि.नाशिक) येथील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक नाशिक विभागीय शिक्षण मंडळाच्या संपादित जागेवरील बांधकामाबाबतची प्रस्तावित तांत्रिक कार्यवाही व निविदा विषयक कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रस्तावित कार्यवाही पुर्ण होवून प्रलंबित असलेल्या उक्त इमारतीच्या बांधकामास सुरुवात झाली आहे काय,

(३) नसल्यास, संपादित जागेवरील प्रस्तावित इमारत बांधकामासाठी नियुक्त वास्तुविषारद यांना कार्यादेश पत्र देणे तसेच या कामासाठीच्या करारनामा करण्यासंबंधीची कार्यवाही पुर्ण होवून देखील बांधकाम सुरु न होण्याचे कारण काय आहे व हे बांधकाम केव्हापर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) सदर जागेवर प्रशासकीय इमारत बांधकामाची ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असून निविदा अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**राज्यातील शासकीय रुग्णालयातील औषधांच्या दुकानातील अनियमिततेवर नियंत्रण ठेवण्याबाबत**

**(१७) * २७२५७ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व औषध प्रशासन विभागाने शासकीय रुग्णालयातील औषधांच्या दुकानात चालणा-या अनियमिततेवर नियंत्रण आणण्यासाठी राज्यातील दुकानांवर छापे टाकले असता ११ दुकानांमध्ये अनियमितता असल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनियमितता आढळून आलेल्या रुग्णालयातील औषध दुकानांबाबत कारवाई करुन अन्य ठिकाणच्या रुग्णालयातील औषध दुकानांमध्ये अनियमितता होवू नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अन्न व औषध प्रशासनाच्या गुप्तवार्ता विभागातील औषध निरीक्षकांकडून दिनांक १४/१०/२०१६ रोजी विशेष मोहिम राबवून राज्यातील एकूण ११ शासकीय व निमशासकीय रूग्णालयातील औषधी भांडाराच्या तपासण्या करण्यात आल्या आहेत. तपासणी करण्यात आलेल्या सदर ११ औषध भांडारापैकी ०९ ठिकाणच्या औषध भांडारात औषधी साठविण्याबाबत व वितरण अभिलेख ठेवण्याबाबत अनियमितता आढळून आली.

(२) सदर शासकीय व निमशासकीय रूग्णालयातील औषधी भांडार हे औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातंर्गत परवानेधारक संस्था नाहीत मात्र सदर कायद्यातील परिशिष्ट के अंतर्गत नमूद अटीनुसार औषधांची साठवणूक, वितरण व त्याचा अभिलेख ठेवणे आवश्यक आहे. याबाबतची पडताळणी करण्याच्या उद्देशाने सदर तपासण्या करण्यात आल्या आहेत. तपासणी दरम्यान आढळलेल्या त्रुटी व अनियमिततेबाबत रूग्णालयाशी संबंधित अधिका-यांना अन्न व औषध प्रशासनाच्या दक्षता विभागाकडून कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शाळांमध्ये महाराष्ट्र छात्र सेना योजना सुरु करण्याबाबत**

**(१८) * २८३०७ श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक २३४९१ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१६ च्या हिवाळी अधिवेशनातील तारांकित प्रश्नाच्या उत्तरात एन.सी.सी. अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव प्रलंबित नसून राष्ट्रीय छात्र सेनेच्या धर्तीवर महाराष्ट्र छात्र सेना योजना सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याचे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाड्यातील विशेषतः बीड जिल्हयातील माध्यमिक शाळांनी कमांड इन ऑफिसर, ५१ महाराष्ट्र बटालियन, औरंगाबाद यांच्याकडे एन.सी.सी. अभ्यासक्रम सुरु करण्याचे प्रस्ताव दाखल करुनही त्यांना हा अभ्यासक्रम सुरु करण्याची परवानगी न मिळाल्याने या कार्यालयात अनेक प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील किती शाळांमध्ये महाराष्ट्र छात्र सेना योजना सुरु आहे व हा अभ्यासक्रम जास्तीत जास्त शाळांमध्ये सुरु करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) एनसीसी अभ्यासक्रमाला मान्यता केंद्र शासनामार्फत दिली जाते. मराठवाड्यातील बीड जिल्हयातील वरिष्ठ विभागातील १३ व कनिष्ठ विभागातील १७ असे एकुण ३० प्रस्ताव मान्यतेसाठी प्रलंबित आहेत.

(३) राज्यातील ११,१९९ शाळांमध्ये महाराष्ट्र योजना सध्या सुरु आहे. सन २००० पासून ही योजना ऐच्छिक ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अपंग शाळातील कंत्राटी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत**

**(१९) * २८५३९ श्री.कपिल पाटील, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक २६०५३ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अपंग शाळातील कंत्राटी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, त्याबाबतची वस्तुस्थिती वा सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) केंद्र पुरस्कृत अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) शासनस्तरावर राबविण्यात येते. दिनांक ०७/०७/२०१५ च्या पत्रान्वये राज्यातील ११८५ विशेष शिक्षक व ७२ परिचर यांच्या युनिट मान्यता व त्यानुषंगाने देण्यात आलेल्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्यात आल्या होत्या त्याविरुध्द काही विशेष शिक्षक/परिचर यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.१०३०/२०१६ दाखल केली. रिट याचिका क्र.१०३०/२०१६ मध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी २५/०८/२०१६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार या विशेष शिक्षकांना सेवेत घेण्याबाबत दिनांक ०५/०१/२०१७ रोजी कळविण्यात आले आहे.

-----------------

## गिट्टीखदान (नागपूर) येथील अल्फिया शेख या खेळाडूला आर्थिक मदत देण्याबाबत

**(२०) * २९२८९ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिट्टीखदान (नागपूर) येथील अल्फिया शेख यांनी पॉवर लिफ्टिंग तसेच राष्ट्रीय पातळीवर विविध खेळात २९ सुवर्ण पदके मिळवूनही शासनाच्या मदतीपासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार अल्फिया शेख या खेळाडूस आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) होय. अल्फिया शेख हीस पॉवरलिफ्टिंग खेळामध्ये विविध राज्य/राष्ट्रीय पातळीवर २९ मेडल प्राप्त आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर तीने कोणतेही मेडल प्राप्त केल्याचे दिसून आले नाही.

सदर खेळाडूकडून विहित प्रपत्रात प्रस्ताव प्राप्त करुन, निकषांनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील हॉटेल व्यावसायिकांकडून सेवाशुल्क आकारले जात असल्याबाबत

**(२१) * २९०१५ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने हॉटेल उद्योगांकडून हॉटेल देयकात आकारण्यात येणारे सेवाशुल्क अनिवार्य नसल्याचा निर्णय घेतला असूनही राज्यातील हॉटेल उद्योगांकडून सेवाशुल्क आकारले जात असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्राहकांना सेवा आवडली तर ग्राहक स्वखुशीने त्यांना वाटेल तेवढे पैसे देतील, परंतु हॉटेलने दिलेल्या सेवेबद्दल ग्राहक खुश आहे की नाही याचा विचार न करता देयकामध्ये सेवाशुल्क समाविष्ट करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन केंद्र शासनाच्या निर्णयाप्रमाणे राज्यातही सेवाशुल्कासाठी ग्राहकांवर जबरदस्ती होऊ नये असे आदेश हॉटेल व्यावसायिकांना देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) याबाबत अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार मंच, ठाणे यांच्याकडे एक तक्रार प्राप्त झाली आहे. त्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(२), (३) व (४) केंद्र शासनाच्या दिनांक १४/१२/२०१६ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन विभागांना उचित कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, वित्त विभाग व अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागांतर्गत येणारे नियंत्रक, वैद्यमापन शास्त्र विभाग व प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांना उचित कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**घिवली (ता.जि.पालघर) गावाला सुरळीतपणे पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(२२) * ३०४४६ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घिवली (ता.जि.पालघर) गावाला सन २०१५ पासून पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत असून राष्ट्रीय ग्रामिण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१६ मध्ये निधी उपलब्ध करुन देण्यात यावा असे निवेदन लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पालघर यांना माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषद, पाणीपुरवठा विभाग यांनी माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान पाहणी करुन पिण्याच्या पाण्याच्या टाकीचा व नविन नळ जोडणीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन घिवली गावाला सुरळीतपणे पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल अंतर्गत सन २०१६-१७ च्या कृती आराखड्यात घिवली (ता.जि.पालघर) गावासाठी नवीन योजनेचा समावेश असून, योजनेच्या रुपये ९६.३८ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास जिल्हा परिषद स्तरावर तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) सदर गावास योजना नुकतीच (म्हणजेच दिनांक ३/०३/२०१७ रोजी) मंजूर झाली असल्याने, पुढील कामे करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन**
**करुन थकीत वेतन देण्याबाबत**

**(२३) * २६८५४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.तानाजी सावंत, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या अतिरिक्त शिक्षकांच्या वेतनाबाबत शासन निर्णय घेणार असुन, ज्या शिक्षकांचे समायोजन झालेले नाही त्यांना मूळ शाळेत कार्यरत ठेवून त्यांचे वेतन देण्यासंदर्भातील प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाकडे सादर केल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात जे शिक्षक अतिरिक्त ठरले त्यांना त्यांचे थकीत वेतन देण्याबाबत दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी शिक्षण आयुक्तांनी राज्यातील सर्व शिक्षण उपसंचालक, शिक्षण अधिकारी व वेतन पथकाच्या अधिक्षकांना आदेश देवूनही सदर शिक्षकांना वेतन देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुकंपा तत्वावर कार्यरत असलेल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांमध्ये त्रुटी असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अतिरिक्त शिक्षकांना थकीत वेतन देण्याबाबत व अनुकंपा तत्वावर कार्यरत असलेल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदामधील त्रुटी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

समायोजन करण्यात आलेल्या शिक्षकांचे वेतन शालार्थ प्रणालीद्वारे करण्यासाठी सदर शिक्षकांची माहिती Detach-Attach करण्यास काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. तसेच काही समायोजित शिक्षकांना शाळांनी हजर करुन घेतले नसल्यामुळे व समायोजन प्रक्रियेविरुध्द मा.उच्च न्यायालयात काही शिक्षकांनी याचिका दाखल केल्याने काही शिक्षकांना वेतन अदा करण्यात आलेले नाही.

(३) हे खरे नाही.

(४) अतिरिक्त शिक्षकांना वेतन अदा करण्याबाबत आयुक्त शिक्षण यांचेमार्फत सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी**
**विद्यापीठातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२४) * २९९९८ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठातील रिक्त पदे अनेक महिन्यांपासून भरण्यात आली नसल्याने त्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर होत असल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूर ४२ पदांपैकी केवळ १३ पदांची भरती करण्यात आली असून शासनाने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये ३.३ कोटी निधी मंजूर करुनही त्यापैकी २.४८ कोटी खर्च करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठातील रिक्त पदे भरण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

प्रश्नात नमूद विद्यापीठातील मंजूर ०७ शिक्षकीय पदे पूर्णपणे भरण्यात आलेली आहेत.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

विद्यापीठातील मंजूर एकूण ४२ पदांपैकी ०७ शिक्षकीय पदे पूर्णत: भरलेली असून या व्यतिरिक्त विद्यापीठाने ०६ शिक्षकीय पदे विद्यापीठ निधीतून भरती केलेली आहेत. तसेच शिक्षकेतर पदांच्या भरती प्रक्रियेची कार्यवाही विद्यापीठाकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कुरखेडा (ता.शेगाव, जि.बुलढाणा) गावात क्षारयुक्त पाण्याची समस्या सोडविण्याबाबत**

**(२५) * २९७४९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरखेडा (ता.शेगाव, जि.बुलढाणा) गावातील साडेसहाशे लोकवस्ती असलेल्या गावात गोडया पाण्याचे स्त्रोत उपलब्ध नसल्याने विहिरी व बोअरचे भूगर्भातील क्षारयुक्त पाणी प्यायल्यामुळे मागील वर्षात तीन तर यावर्षात दोन जणांचा किडनीच्या आजाराने मृत्यू झाला असून सध्या आठ जणांवर किडनीच्या आजारावरील औषधोपचार सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गावातील क्षारयुक्त पाण्याची समस्या सोडविण्यासाठी आर.ओ.प्लॅन्ट लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

कुरखेडा गावामध्ये आरोग्य विभागामार्फत केलेल्या सर्वेक्षणानुसार जानेवारी, २०१५ ते फेब्रुवारी, २०१७ मध्ये किडनीच्या आजाराचे ११ रुग्ण आढळून आले व त्यापैकी एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. आढळलेले किडनी रुग्ण व मृत्यू हे क्षारयुक्त पाणी पिल्यानेच झाले आहेत असे निश्चितपणे सांगता येत नाही.

(२) सदर गावाच्या मागणीनुसार नोव्हेंबर, २०१६ मध्ये तातडीने सर्वेक्षण करुन, पाणीटंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत खाजगी विहिर अधिग्रहित करुन तात्पुरती पुरक योजना आखण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मळेगाव (ता.शहापूर, जि.ठाणे) गावात पिण्यासाठी पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२६) * २८५०५ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मळेगाव (ता.शहापूर, जि.ठाणे) गावासाठी सन २००८-२००९ या वर्षात ८३ लाख ७५ हजार ५१ रुपयांचा निधी मंजूर होवून ७ वर्ष झाली असूनही या योजनेतून मळेगाव ग्रामस्थांना पिण्यासाठी पाणी मिळाले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेतील गैरव्यवहार, निकृष्ट दर्जाचे काम व अनियमितता आदीबाबत तक्रारी करूनही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने मळेगाव ग्रामस्थांनी दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास शहापूर तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

सन २००८-०९ या कालावधीत भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत मौ.मळेगाव, ता.शहापूर येथे रक्कम रुपये ५३,७५,०५१/- ची नळ पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली होती. माहे डिसेंबर, २०१५ ते जून, २०१६ पर्यंत पाणीपुरवठा सुरु होता. नंतर ग्रामपंचायत व समितीच्या देखभाल दुरुस्ती अभावी योजना जून, २०१६ ते डिसेंबर, २०१६ पर्यंत बंद होती. सद्य:स्थितीत या योजनेद्वारे पाणीपुरवठा सुरु केलेला आहे.

(२) व (३) होय.

मळेगाव येथील ग्रामस्थ दिनांक १४ डिसेंबर, २०१६ दरम्यान शहापूर तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले होते.

ग्रामस्थांच्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर योजनेच्या कामाची चौकशी उप अभियंता, उपविभाग अंबरनाथ यांच्यामार्फत करण्यात आली. सदर योजनेच्या कामात तांत्रिक अनियमितता झाली असून, त्यास जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांना दिनांक १४/२/२०१७ अन्वये कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. त्यांचे खुलासे प्राप्त होताच पुढील कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईसह राज्यात मध्यान्ह भोजन योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत**

**(२७) * २७०३२ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात वंचित घटकांतील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी मध्यान्ह भोजन योजनेसाठी केंद्र शासनाकडून मिळणारा निधी शासन योग्यरित्या वापरत नसल्यामुळे तीन वर्षांपासून शासनाने एकदाही केंद्राच्या निधीचा १०० टक्के वापर केला नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात ७५ टक्के शाळांमध्ये गॅस उपलब्ध नसून तेथे जुन्या पध्दतीने मध्यान्ह भोजन तयार केले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार मध्यान्ह भोजन योजनेकडे दुर्लक्ष व निधीचा अर्धवट वापर करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे. तथापि, उर्वरित शाळांमध्ये गॅस कनेक्शन उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला असून यानुसार कार्यवाही करण्याचे आदेश क्षेत्रिय यंत्रणाना देण्यात आले आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरासह राज्यात शिक्षणाचा अधिकार (आरटीई) प्रवेशाच्या प्रसिध्दीकरीता निधीची तरतूद करण्याबाबत**

**(२८) * २७३६८ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरासह राज्यात शिक्षणाचा अधिकार (आरटीई) प्रवेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने स्थानिक वृत्तपत्रात बातमी देणे, भिंतीपत्रक लावणे, बॅनर तयार करणे, व्हिडीओ क्लिप तयार करणे आदि कामांची यादी दिली असली तरीही निधीची तरतूद केलेली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने आरटीई प्रवेश प्रसिध्दीकरीता निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) राज्यात शिक्षणाचा अधिकार (आरटीई) प्रवेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने स्थानिक वृत्तपत्रात बातमी देणे, भिंतीपत्रक लावणे, बॅनर तयार करणे, व्हिडीओ क्लिप तयार करणे आदि कामांकरीता वेगळयाने तरतूद करण्याची आवश्यकता नसून शिक्षण संचालकांना देण्यात येणा-या तरतूदीतून सदर खर्च करावयाचा आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाच्या अहवालानुसार महाविद्यालयांवर कारवाई करण्याबाबत**

**(२९) * ३०४२० श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.आनंदराव पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २४४३२ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाच्या अहवालानुसार राज्यातील १०९ महाविद्यालयाने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेला जमीन, बांधकाम आणि मनुष्यबळ अशी तीन प्रकारची बनावट माहितीपत्र सादर करुन मुदतवाढ घेतली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी महाविद्यालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) संचालक, तंत्रशिक्षण यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार एकूण ३३ संस्थांनी खोटी माहिती दिल्याचे निदर्शनास आले आहे. दोषी महाविद्यालयांना संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांच्यामार्फत कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---------------------

## सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या विधी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी वयाची अट रद्द करण्याबाबत

**(३०) * ३०००९ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या विधी शाखेचा अभ्यासक्रम पुढील वर्षापासून बदलणार असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाच वर्षाच्या विधी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी २० पेक्षा कमी वय आणि तीन वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी ३० पेक्षा कमी वय अशी अट असल्याने महाविद्यालयांतील रिक्त जागांची संख्या वाढून अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वयाची अट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय. हे खरे आहे.

बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या निकषानुसार पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या विधी विद्याशाखेंतर्गत असलेल्या बी.ए.एल.एल.बी (पाच वर्षे) व एल.एल.बी. (तीन वर्षे) हा अभ्यासक्रम सुधारित करण्यासाठी मा.कुलगुरु यांनी डॉ.टि.एस.एन.शास्त्री, विभाग प्रमुख, विधी विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली असुन सदर समितीची कार्यवाही अद्याप सुरु आहे.

(२) नाही. हे खरे नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सध्या सुरु असलेल्या पाच व तीन वर्षाच्या विधी अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना वयाची कुठलीही अट नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पखरुड (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील शिधापत्रिकाधारकांना धान्य व केरोसिनचे वाटप करण्याबाबत

**(३१) * २९४३५ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पखरुड (ता.भूम, जि.उस्मानाबाद) ग्रामपंचायत कार्यालय येथील वडाचा व बाराबाई वस्तीमध्ये ७० ते ७५ शिधापत्रिकाधारकांना धान्य व केरोसिनचे वाटप होत नसल्याने गैरसोय निर्माण झाली असून येथील ग्रामस्थांना २ कि.मी अंतरावर धान्य व केरोसिन आणण्यासाठी जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पखरुड ग्रामपंचायत सरपंच यांनी तहसिलदार व तलाठी यांच्याकडे दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास धान्य व केरोसिनची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत विनंती करुनही कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार ग्रामस्थांची होणारी गैरसोय लक्षात घेवून पर्यायी व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

पखरुड (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील रास्तभाव धान्य दुकान व वडाचा व बाराबाई वस्ती यामध्ये अंदाजे १ कि.मी. अंतर आहे. मौजे वडाचा मळा व बाराबाई वस्ती येथील शिधापत्रिकाधारकांना माहे जानेवारी, २०१७ च्या अन्नधान्याचे व केरोसीनचे वाटप करण्यात आलेले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची दूरवस्था झाल्याबाबत

**(३२) * २७२९१ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) येथील जिल्हा परिषदेच्या ४० शाळांमध्ये बहुतेक ठिकाणच्या शौचालयांना छप्पर नाहीत, दरवाजे-खिडक्या नाहीत तर काहींच्या भिंती मोडकळीस आलेल्या आहेत अशा धोकादायक परिस्थितीत आदिवासी मुले शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समर्थन या संस्थेने दिनांक २६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.आदिवासी विकास मंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री, मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे सदर समूह साधन केंद्रांच्या झालेल्या दुरवस्थेबाबत निवेदन पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर शाळांच्या दूरवस्थेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

मोखाडा (जि.पालघर) येथील जिल्हा परिषद शाळांमधील २१ स्वच्छतागृह वापरण्यास योग्य नाहीत/ मोडकळीस आली आहेत.

(२) होय.

(३) याबाबत तपासणीची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिवकालीन किल्ल्यांचे जतन करण्याबाबत

**(३३) * २७२२६ श्री.संजय दत्त, श्री.नारायण राणे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील सिंधुदुर्ग किल्ल्याचे तसेच राज्यातील विविध गड, किल्ले व ऐतिहासिक वास्तुंचे जतन, देखभाल व दुरूस्ती करण्याबाबत नागरिकांकडून सातत्याने मागणी करण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडांवर स्थानिकांनी चहा व नास्त्याची विक्री सुरु केल्याने गडांवर कचरा वाढू लागला असून काही ठिकाणी दुरुस्तीचे काम चुकीच्या पध्दतीने केल्याने गडांचे विद्रुपीकरण झाल्याच्या तक्रारीही करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात ३५० हून अधिक शिवकालीन गडकिल्ले दयनीय अवस्थेत असून या गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी शासनाने ४० कोटींचा निधी मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिवकालीन गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील नळ पाणीपुरवठा योजनेची कामे पूर्ण करण्याबाबत

**(३४) * ३०५६५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यात दरवर्षी मार्च महिन्यात बहुसंख्य गावपाडयांना पाणीटंचाई भासत असून नदी नाले आटल्याने तसेच विहिरींनी तळ गाठल्याने यावर्षी ४० दिवस पुरेल इतकेच पाणी शिल्लक राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कायमस्वरुपी नळ पाणीपुरवठा योजना लागू करण्यासाठी रुपये १ कोटी ९७ लाख ५९ हजार खर्च करूनही अशा साखरे, केव, खांड उधाणीपाडा, दादडे, जांभा, हातणे, टेटवाली, उपराळे, उटावली, देहर्जे या १० ग्रामपंचायतींमधील योजना मागील ११ वर्षांपासून अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजना अपूर्णावस्थेत असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नळ पाणीपुरवठा योजनेची प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) नाही, हे खरे नाही.

सद्य:स्थितीत पाण्याचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

साखरे, केव, देहर्जे या योजना सन २००५-०६ मध्ये सुरु झाल्या असून सध्या न्यायप्रविष्ट आहेत. देहर्जे व हातणे नळ पाणीपुरवठा योजनेचे कंत्राट एकाच कंत्राटदाराकडे दिले होते. पैकी देहर्जे योजना न्यायप्रविष्ट झाल्यामुळे संबंधित कंत्राटदाराने हातने योजनेचे काम अपूर्ण ठेवले आहे. सद्य:स्थितीत नवीन पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने उर्वरित काम करुन योजना पूर्ण करण्याची तयारी दर्शविली आहे. दादडे योजना सन २००६-०७ साली सुरु झाली असून विद्युत दाब कमी मिळत असल्याने योजना बंद आहे. जांभा योजना सद्य:स्थितीत पूर्ण आहे. खांड उधाणीपाडा, टेटवाली, उपराळे, उटावली या योजनांना सन २०११-१२ मध्ये मंजूरी मिळाली असून सद्य:स्थितीत प्रगतीपथावर आहेत.

(४) विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्यामार्फत मागील १० वर्षातील कामांची चौकशी करण्यात आली आहे. न्यायप्रविष्ट योजनांच्या बाबतीत न्यायालयीन निवाडा झाल्यानंतर पुढील कारवाई करणे अपेक्षित आहे. इतर अपूर्ण योजना पूर्ण करण्यासाठी कालबध्द नियोजन करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सायन कोळीवाडा (मुंबई) येथील सनातन धर्म हायस्कुल**
**या शाळेची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३५) * २९०६५ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सायन कोळीवाडा (मुंबई) येथील गुरुतेजबहादूर सिंग नगरातील सनातन धर्म हायस्कुल या शाळेच्या इमारतीचा स्लॅब कोसळून मुस्कान हसन या ५ वर्षाच्या मुलीचा मृत्यू झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहा महिन्यापूर्वी झालेल्या पालकसभेत स्लॅब कमकुवत असल्याबाबत पालकांनी शाळा प्रशासनाकडे तक्रारी केल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळा प्रशासन व संचालक यांच्याविरुध्द कारवाई करुन शाळेची मान्यता रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका, शिक्षण विभागाकडे तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) यानुषंगाने आवश्यक कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील सर्व शाळा डिजिटल करण्याबाबत**

**(३६) * २७७०५ श्री.नारायण राणे, श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक २०६२२ ला दिनांक २८ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शाळा प्रगत करण्याचे उद्दीष्ट असफल झाल्याने "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" ऐवजी आता "जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" हा कार्यक्रम शालेय शिक्षण विभागाने प्रस्तावित केला असून राज्यातील सर्व वर्ग माहे मार्च, २०१७ पर्यंत डिजिटल करण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर शालेय शिक्षण विभागाने कोणत्या उपाययोजना आखल्या आहेत व सदर प्रस्तावावर कधीपर्यत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे, तसेच उक्त कार्यक्रमासाठी शासनाने किती निधीची तरतूद केली आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) शासन निर्णय दिनांक ०९ जानेवारी, २०१७ अन्वये जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हा कार्यक्रम राबविण्यात येत असून, सर्व शाळा डिजिटल करण्याचे ध्येय ठरविण्यात आले आहे. तथापि, याबाबत शासनाचा कोणताही अतिरिक्त निधी घेण्यात येणार नाही. सदर कार्यक्रम लोकसहभागातून/CSR च्या सहाय्याने राबविण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शाळा व वर्ग तुकडयांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(३७) * २७७४५ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी, प्राथमिक व माध्यमिक शाळा व वर्ग तुकडयांवरील ८ हजार ९७० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांना शासनाने मुल्यांकन निकषानुसार सन २०१६ मध्ये मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील १५ वर्षापासून शासनाने मंजूर पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी निधी उपलब्ध न केल्याने त्यांना विनावेतन काम करावे लागत असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येत्या अंदाजपत्रकात (Budget) तरतूद करुन प्रलंबित वेतन अनुदान वितरीत करण्यात यावे, अशी मागणी शिक्षक परिषद संघटनेने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये शासनाकडे केली असल्याने उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) सदर शाळांना अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुटीबोरी (नागपूर) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतर्गत असलेल्या प्लॅन्ट मधून होणारे प्रदुषण रोखण्याबाबत

**(३८) * २७१४७ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुटीबोरी (नागपूर) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांतर्गत इंडोराम विदर्भ पॉवर इंड्रस्टिज लि. व मोरारजी कंपनी पॉवर प्लॅन्ट मधून निघणारी निरूपयोगी राख अवैधरित्या वटेघाट परिसरात टाकली जात असल्याचे दिनांक ०९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पॉवर प्लॅन्ट मधून निघणारी राख हवेत उडत असल्यामुळे परिसरातील शेतक-यांच्या पिकांचे नुकसान होत असून लोकांना प्रदूषणाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांना अनुदान देण्याबाबत**

**(३९) * २७५९१ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.रविंद्र फाटक, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कायम विनाअनुदानित तत्वावर चालविण्यात येणा-या उच्च माध्यमिक शाळा, ज्युनिअर महाविद्यालय यांचा कायम शब्द काढा अन्यथा बारावी परिक्षांवर बहिष्कार टाकण्याचा इशारा माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शिक्षकांनी दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदान मिळत नसल्याने मागील १६ वर्षापासून शिक्षक विनावेतन काम करीत असून उच्च माध्यमिक शाळांना सन २०१४-१५ पासून अनुदान देण्याबाबत शासनाने आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कायम शब्द वगळलेल्या शाळा, ज्युनिअर महाविद्यालय यांना त्यातारखेपासून १०० टक्के अनुदान द्यावे, शिक्षकेतर कर्मचा-यांना वैयक्तिक मान्यता द्याव्यात, सर्व शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, कायम विनाअनुदानित शाळा आणि ज्युनिअर महाविद्यालयमधील सेवा वरिष्ठ आणि सेवा वेतनश्रेणीसाठी ग्राहय धरावी इत्यादी मागण्या शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच उच्च माध्यमिक शाळा वर्ग व तुकड्या यांची क्षेत्रिय अधिका-यांकडून तपासणी करून या शाळा व वर्ग तुकड्या अनेक दिवसापासून मान्यतेसाठी शिक्षण संचालनालय व आयुक्त, शिक्षण यांच्याकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उच्च माध्यमिक शाळा वर्ग व तुकड्या अनुदानास पात्र करूनही विनावेतन काम करणा-या प्राध्यापकांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, खरे आहे. तथापि, कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या परवानगी आदेशातील "कायम" शब्द हा शासन निर्णय दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ अन्वये वगळण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर शाळांना अनुदान अनुज्ञेय राहील अशी तरतूद आहे. शिक्षकांना वेतन देण्याची जबाबदारी ही संबंधित संस्थेची आहे.

(३) होय, खरे आहे.

(४) मुल्यांकनाबाबतची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर सुरु आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात बाटलीबंद पाणी विकणाऱ्या नामांकित कंपन्यांकडून ग्राहकांची फसवणूक होत असल्याबाबत**

**(४०) * २६९६५ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २५९०० ला दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बाटलीबंद पाणी विकणाऱ्या हिंदुस्थान कोकाकोला, पेप्सिको इंडिया, होल्डींग, रेडबुल इंडिया आणि युरेका फोर्ब्स या नामांकित कंपन्यांनी बाटलीबंद पाण्याच्या विक्रीसाठी दोन वेगवेगळ्या किंमती छापल्यासंदर्भात २४ खटले नोंदविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कंपन्यांविरुध्द वैधमापनशास्त्र अधिनियम, २००९ अंतर्गत नियमानुसार करण्यात आलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, एकाच उत्पादनाच्या दोन वेगवेगळ्या किंमती छापून राज्यात ग्राहकांची फसवणुक केल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार संबंधित कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) ऑक्टोबर, २०१६ मध्ये हिंदुस्थान कोकाकोला, पेप्सिको इंडिया होल्डींग आणि युरेका फोर्ब्स या कंपन्यांविरुध्द बाटलीबंद पाण्याच्या विक्रीसाठी दोन वेगवेगळ्या किंमती छापल्याबद्दल २२ खटले व शीतपेयावर दोन वेगवेगळ्या किंमती छापल्याबद्दल रेडबुल इंडिया या कंपनीविरुध्द २ खटले नोंदविले आहेत. त्यानुसार सदर कंपन्याविरुध्द वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९ अंतर्गत नियमानुसार करण्यात आलेली कार्यवाही अद्याप सुरु आहे.

(३) होय, ऑक्टोबर, २०१६ मध्ये राज्यामध्ये तपासणी करुन संबंधित दोषी आस्थापनांविरुध्द खटले दाखल केले असून त्यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### अनुदानास पात्र शाळांना २० टक्के अनुदान देण्याचा निर्णय घेतल्याबाबत

**(४१) * २८५४७ श्री.कपिल पाटील, श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजी शालेय शिक्षण विभागातील कायम विनाअनुदानावरुन अनुदानास पात्र शाळांना सरसकट २० टक्के अनुदान देण्याचा निर्णय घेतला असून राज्यातील विनाअनुदानित शाळांना घोषित झालेले २० टक्क्याचे अनुदान देण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन निर्णय दिनांक १४ जून, २०१६ रोजीपर्यंत अनुदानास पात्र शाळांकरीताच लागू करण्यात आलेला असल्याने अघोषित शाळांची यादी जाहिर न झाल्यामुळे त्यांनाही या निर्णयाचा फायदा मिळालेला नसल्याने दिनांक १ जूलै, २०१६ व दिनांक २ जुलै, २०१६ रोजी शासनाने अजून काही अनुदानास पात्र शाळांची यादी प्रसिध्द केली असून या सर्व शाळांचा समावेश दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ च्या सरसकट २० टक्के वेतनवाढ यादीमध्ये करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, २० टक्के अनुदानाच्या शासनाच्या धोरणामुळे किमान वेतन कायदयाचे उल्लंघन होत असल्याने शासनाने याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे मूल्यांकन होऊनही त्यांचे अनुदान जाहिर न होण्याबाबत कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही. शासन निर्णय दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ अन्वये अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही. दिनांक १ व २ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयान्वये मूल्यांकनात पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) याबाबत सकारात्मक कार्यवाही सुरु आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दिग्रस (जि.यवतमाळ) शहरात कापूस खरेदीत शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याबाबत**

**(४२) * २९२७७ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिग्रस (जि.यवतमाळ) शहरात खाजगी व्यापाऱ्यांनी अन्न व नागरी पुरवठा विभागाने अधिगृहीत केलेली वजने न वापरता दगड, विटांची वजने वापरुन कापूस खरेदीत शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार खाजगी व्यापाऱ्यांमार्फत कापूस खरेदीत शेतकऱ्यांची फसवणूक न होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) नाही, हे खरे नाही, तथापि कापूस खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांकडील वजन मापांची नियतकालिक फेरपडताळणी व मुद्रांकन करण्यात येते व त्यांची तपासणी करुन उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**साठ्ये महाविद्‌यालय, विलेपार्ले (मुंबई) येथील प्राचार्य व अधिकाऱ्यांनी नियमबाहय शुल्क आकारल्याबाबत**

**(४३) * २७२२५ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साठ्ये महाविद्‌यालय, विलेपार्ले (मुंबई) येथील प्राचार्य व अधिकाऱ्यांनी सन २००९ ते २०१४ या कालावधीत महाविद्‌यालयातील मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांकडून नियमबाहय शुल्क आकारुन शासनाची व विद्‌यापीठाची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विंलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

अशा प्रकारची तक्रार मुंबई विद्‌यापीठाच्या विशेष कक्षास उपाध्यक्ष, मुंबई विद्‌यापीठ महाराष्ट्र राज्य कार्यकारणी सदस्य, महाराष्ट्र नवनिर्माण विद्‌यार्थी सेना यांच्याकडून त्यांच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०११ च्या निवेदनाद्‌वारे प्राप्त झाली होती.

(२) सदर तक्रार विद्‌यापीठाने स्थायी समितीच्या उपसमितीपुढे ठेवली होती व तक्रारदारास जादा फी आकारण्यात आल्याबाबतचा योग्य तो पुरावा सादर करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार तक्रारदाराने पुरावा सादर केल्यानंतर समितीने पुढीलप्रमाणे ठराव पास केला. (१) मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांकडून घेतलेले जादा शुल्क संबंधित विद्‌यार्थ्यांस ८ दिवसांत परत करावे, (२) भविष्यात मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांची नियमानुसार फी घेण्यात येईल असे हमीपत्र प्राचार्यांनी द्‌यावे, (३) संस्थेच्या अध्यक्षांनी प्राचार्यास लेखी समज द्‌यावी तसेच

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या माहितीकरीता अभ्यासक्रमानुसार शुल्काचा सूचना फलक महाविद्यालयामध्ये दर्शनी ठिकाणी लावावे व (४) संस्था अध्यक्षांनी समाजकल्याण कार्यालयाच्या दिनांक २४/०६/२००४ च्या परिपत्रकानुसार प्राचार्यविरुध्द कारवाई करावी. समितीच्या ठरावानुसार संस्था अध्यक्षांनी कारवाई केली असल्याचे मुंबई विद्यापीठाने नमूद केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वायु प्रदूषण रोखण्याबाबत

**(४४) * ३०१०१ आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक २०८२५ ला दिनांक २१ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाढते वायु प्रदूषण रोखण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, निरी व आयआयटीच्या सहकार्याने वायु प्रदूषण रोखण्याकरिता यंत्र तयार केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील वायु प्रदूषण रोखण्यासाठी सदरील यंत्र बसविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सद्य:स्थितीत प्रायोगिक तत्वावर वांद्रे, घाटकोपर, भांडूप व सायन येथे हवा शुध्दीकरण यंत्रणा (विंड ऑग्मॅटेशन अँड प्युरीफायींग युनिट) (WAYU) उभारली असून ती कार्यरत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजापुर (जि.रत्नागिरी) तालुक्यात पाणीटंचाईवर मात करण्याबाबत

**(४५) * ३०२८९ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापुर (जि.रत्नागिरी) तालुक्यात माहे एप्रिल-मे, २०१७ मध्ये होणारी पाणीटंचाई निवारण्यासाठी रुपये १ कोटी २६ लाखांचा आराखडा तालुका प्रशासनाने तयार केला असल्याचे दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाणीटंचाई निवारण्यासाठी आवश्यक असलेले रुपये १ कोटी २६ लाख तालुका प्रशासनास देण्याबाबत तसेच उक्त आराखडयामध्ये जवळेथर गावातील धावडेवाडीचा समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) राजापुर तालुक्यात माहे एप्रिल ते जून या कालावधीतील पाणीटंचाई निवारण्याकरिता तालुकास्तरावरुन रुपये १.८८ कोटी इतक्या रक्कमेचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.

(२) पाणीटंचाई कृती आराखडयात समावेश असलेल्या उपाययोजनांपैकी आवश्यक त्या उपाययोजनांना जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर योजना राबविण्यात येतात. त्यानुसार राजापूर तालुक्यातील पाणीटंचाई निवारणार्थ जिल्हाधिका-यांकडून उपाययोजनानिहाय निधीची मागणी प्राप्त झाल्यानंतर शासनाकडून निधी वितरीत करण्यात येईल.

मौजे जवळेथर धावडेवाडीमध्ये सन २०१६-१७ मध्ये पाणीटंचाई भासण्याची शक्यता नसल्याने या वाडीचा समावेश संभाव्य पाणीटंचाई कृती आराखडयात करण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती शहरात व ग्रामिण भागात गुटखा विक्रीवर बंदी आणण्याबाबत**

**(४६) * २९२३१ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुटखा बंदी असताना अमरावती शहरात व ग्रामिण भागात पानटपऱ्यांवर गुटखा विक्री सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अन्न व औषधी प्रशासन विभागाचे अधिकारी व स्थानिक पोलिसांच्या संगनमताने गुटखा विक्री होत असून गुटखा विक्री करणाऱ्या पानटपरी मालकांविरुध्द तसेच दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयातील उपहारगृहामधील जंक फुडवर घातलेले निर्बंध रद्द करण्याबाबत**

**(४७) * २७८६३ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयाच्या उपहारगृहामधून विद्यार्थ्यांसाठी चहा कॉफीसह अन्य खाद्यपदार्थांची विक्री केली जात असून, विद्यार्थांमध्ये आकर्षण असलेल्या पिझ्झा, बर्गर या खाद्यपदार्थावर जंक फूड म्हणून निर्बंध घालण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने (UGC) घेतला असून उक्त खाद्यपदार्थ देण्यास बंदी घातली असल्याचे दिनांक १० नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जंक फूडमध्ये कोणकोणते खाद्यपदार्थ येतात व त्यावर बंदी घालण्याबाबत शासनाने कोणतेही आदेश निर्गमित केले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जंक फूडवर घातलेले निर्बंध रद्द करण्याबाबत सर्व महाविद्यालयीन विद्यार्थी संघटनेचे प्रतिनिधी तसेच लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदन मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांचेकडे माहे नोव्हेंबर, २०१६ व माहे जानेवारी, २०१७ मध्ये सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे, तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाचे सदरचे पत्र उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सर्व अकृषि विद्यापीठांना आवश्यक कार्यवाहिस्तव पाठविले आहे.

(२) ज्या अन्नपदार्थांमध्ये कॅलरीजचे प्रमाण जास्त व न्युट्रीशनल व्हॅल्यु कमी असते अश्या अन्नपदार्थांना सर्वसाधारणपणे जंक फुड संबोधिले जाते. मात्र अधिकृतपणे अन्न सुरक्षा व मानदे कायदा, २००६ अंतर्गत जंक फुड ची कोणतीही व्याख्या नमुद नाही. प्रामुख्याने जंक फुड म्हणून अशा कोणत्याही अन्नपदार्थांवर बंदी घालण्याबाबत शासनाने कोणतेही आदेश निर्गमित केलेले नाहीत.

(३) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**प्रशिक्षित अपदवीधर वेतनश्रेणीत काम करणा-या शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत**

**(४८) * २६८८२ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी व्यवस्थापनामार्फत चालविल्या जात असलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक विद्यार्थी संख्येअभावी अतिरिक्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशिक्षित अपदवीधर (D.Ed.) वेतनश्रेणीत काम करणारे शिक्षक अतिरिक्त झाले असून व खाजगी शाळांमध्ये अपदवीधर (D.Ed.) वेतनश्रेणीची पदे उपलब्ध नसल्याने त्यांचे आजतागायत समायोजन झाले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत चालविल्या जात असलेल्या शाळांमध्ये मागील अनेक दिवसांपासून शिक्षक पदभरतीला बंदी घातल्याने या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या वाढल्यामुळे प्रशिक्षित अपदवीधर पदे वाढली आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमध्ये रिक्त असलेल्या पदावर खाजगी व्यवस्थापनामार्फत चालविल्या जात असलेल्या शाळेतील प्रशिक्षित अपदवीधर वेतनश्रेणीत काम करणा-या शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळावर (एमपीसीबी) सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत**

**(४९) * २६९६६ डॉ.अपूर्व हिरे : दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक १८५८५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळावर (एमपीसीबी) कायद्यानुसार आवश्यक असलेल्या सदस्यांच्या नियुक्तीबाबतच्या प्रस्तावावर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात पर्यावरण संरक्षण तसेच जनतेचे आरोग्य संवर्धनाच्या दृष्टीकोणातून सदरील मंडळावर आवश्यक सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(३) अद्याप कोणताही निर्णय झालेला नसल्यास, तो केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१) नाही.

(२) व (३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळावर कायद्यानुसार आवश्यक असलेल्या सदस्यांच्या नियुक्तीबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे. शासनाची मान्यता प्राप्त होताच सदर नियुक्त्या करण्यात येतील.

-----------------

**राज्यातील अनुकंपा तत्वावर नियुक्त झालेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्याबाबत**

**(५०) * २८४८५ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २०२७१ ला दिनांक २१ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये अनुकंपा तत्वावर नियुक्त झालेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या नियमित करण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नियुक्त्या प्रलंबित असल्याने मृत पावलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांची आर्थिक परिस्थिती हलाखीची झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) शासन निर्णय दिनांक २० जानेवारी, २०१६ नुसार पुढील कार्यवाहीबाबत कळविण्यात आले आहे.

-----------------

**महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळाच्या तपासनिकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(५१) * २७४५४ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या तपासनिकांचे मानधन अत्यल्प असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दहावी बोर्डाच्या तपासनिकाला सव्वाचार रूपये तर बारावीच्या तपासनिकाला रुपये ५ मानधन तर पर्यवेक्षकांना फक्त रुपये २५ मानधन दिले जाते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यावर्षी दहावीसाठी ३ लाख ८४ हजार तर बारावीसाठी ३ लाख ३० हजार इतक्या विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले असून त्यांचेकडून वाढीव शुल्क घेतलेले असतानाही मानधनात वाढ झाली नसल्याने शिक्षकांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात वाढ झाली असल्याने विविध घटकांच्या मानधनात वाढ करण्याची मागणी होत आहे. याबाबत विचारविनिमय सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.